

चार दिवसांत अनेक घडामोडी;, पण प्रभाग 15 ने दाखवले 'जहां भरोसा होता है, वहां मौजूदगी की जरूरत नहीं होती!

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in सोमवार दिनांक 03/11/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 256 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# अजितदादांची विजयी घोडदौड कायम!

## महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेच्या अध्यक्षपदावर चौथ्यांदा मोहोर

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांची महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेच्या (एमओए) अध्यक्षपदी सलग ४ वेळा पुन्हा एकदा सर्वसंमतीने निवड झाली आहे.**



अजित दादांच्या या विजयामुळे राजकारणासोबतच त्यांची क्रीडा क्षेत्रावर सुद्धा भक्कम पकड असल्याचं अधोरेखित झालं आहे.एकूण ३१ क्रीडा संघटनांपैकी तब्बल २२ पेक्षा जास्त संघटनांनी अजित पवार यांच्या पॅनेलला पाठिंबा दिला होता. यातुन त्यांच्या नेतृत्वावर क्रीडा क्षेत्राचा असलेला विश्वास पुन्हा एकदा स्पष्ट झाला आहे. अजित पवार यांच्या पॅनलमधील आदिल सुमारिवाला, प्रदीप गंधे आणि प्रशांत देशपांडे यांची उपाध्यक्षपदांवर बिनविरोध निवड झाली असून यामुळे अजितदादांच्या नेतृत्वावर असलेल्या विश्वासावर शिक्कामोर्तब झाला आहे.या निवडणुकीआधी भाजप-युतीत समन्वय राखण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत महत्त्वपूर्ण चर्चा पार पडल्या. त्या चर्चेत मुरलीधर मोहोळ यांच्या पॅनेलला काही पदांचा वाटा देण्याचा निर्णय घेण्यात आला, ज्यामुळे महायुतीत समन्वय कायम राहिला.

यामुळे अजित दादा पुन्हा एकदा महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशनचा कारभार चौथ्यांदा सांभाळणार आहेत.राजकारण आणि क्रीडा या दोन्ही क्षेत्रात अजित पवार यांचा दीर्घ अनुभव आणि बेरजेचे राजकारण व यामुळे सर्व पक्ष आणि हितसंबंधी संस्थांनी त्यांच्यावर पुन्हा एकत्रित विश्वास दाखवला.

राज्यातील क्रीडा आस्थापनांचे सशक्तीकरण, खेळाडू कल्याण आणि पारदर्शी व्यवस्थापन या अजितदादांच्या जमेच्या बाजू राहिलेल्या आहेत त्यामुळे अजित दादांचे नेतृत्व निर्णायक ठरणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

नव्या कार्यकारिणीसमोर राज्यातील खेळाडू घडविणे, ग्रामीण भागातील क्रीडा पायाभूत सुविधा विकसित करणे आणि महाराष्ट्राला राष्ट्रीय स्तरावर अधिक स्पर्धात्मक बनविण्याची जबाबदारी असेल. अजितदादांच्या सक्षम नेतृत्वाखाली ही वाटचाल अधिक प्रेरक ठरेल, असा सर्वसामान्यांचा विश्वास आहे.

# विमानतळाच्या भूसंपादनासाठी पाच हजार कोटी लागणार - जिल्हाधिकारी डुडी

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे :पुरंदर येथील प्रस्तावित विमानतळाच्या भूसंपादनासाठी अंदाजे पाच हजार कोटी रुपये लागतील, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी शुक्रवारी (दि. ३१) दिली. सात गावांतील १ हजार २८५ हेक्टर अर्थात तीन हजार एकर भूसंपादन करण्यात येणार आहे.**



दरम्यान जमिनीचा मोबदला आणि परतावा वाढवून मिळावा, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे. त्याबाबत राज्य सरकारकडे चर्चा करू, असेही डुडी यांनी स्पष्ट केले आहे.डुडी यांनी शुक्रवारी या सातही गावांमधील शेतकऱ्यांशी चर्चा केली. यावेळी मोबदला किती देण्यात येईल, यासंदर्भात प्रशासनाने त्यांची बाजू शेतकऱ्यांना सांगितली. मोबदला वाढवून मिळावा, एरोसिटीमध्ये दहा टक्क्यांऐवजी अधिक जागेचा परतावा मिळावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी यावेळी केली.नवी मुंबई येथे शेतकऱ्यांना २२.५ टक्के जागा परतावा मिळाला. मात्र, तेथे भूसंपादनासाठी शेतकऱ्यांना पैसे मिळाले नव्हते. पुरंदर येथील सात गावातील शेतकऱ्यांना जमिनीसाठी ठरलेल्या दराच्या चौपट रक्कम आणि दहा टक्के जागेचा परतावा देण्यात येणार आहे.याबाबत डुडी म्हणाले, "शेतकऱ्यांची मागणी आम्ही राज्य सरकारला कळवू. मोबदला किती द्यावयाचा, ते राज्य सरकार ठरविणार आहे.. वाटाघाटीची पहिली बैठक आज झाली. आणखी दोन बैठका होतील. जमिनीची मोजणी झाली आहे. त्याबाबत नक्की किती जमिनीचे संपादन करावयाचे आहे, त्याचा ३२-१ चा प्रस्ताव येत्या आठवड्यात राज्य सरकारला पाठविण्यात येईल.प्रस्ताव मान्य झाल्यावर मोबदला किती द्यावयाचा याचा निर्णय घेण्यात येईल.त्याबाबतचा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविला जाईल. त्यानंतर भूसंपादन आणि मोबदला देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येईल."

2
दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
सोमवार दिनांक 03/11/2025
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# चिंचवड येथे भव्य पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी: युवा आमदार अमित गोरखे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पिंपरी-चिंचवड शहरामध्ये साहित्य उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत ४ नोव्हेंबर ते ६ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत भव्य पुस्तक प्रदर्शन भरवले जाणार आहे.**




हे प्रदर्शन नोव्हेल इंटरनॅशनल स्कूल, थरमॅक्स चौक, चिंचवड येथे होणार असून, साहित्यप्रेमींसाठी ही एक पर्वणीच ठरणार आहे.यासोबतच, आमदार अमित गोरखे यांचा अभीष्टचिंतन सोहळा ४ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५:०० वाजता राजर्षी शाहू क्रीडांगण येथे आयोजित करण्यात आला आहे. यानिमित्त अनेक मान्यवर उपस्थित राहणार असून, हा सोहळा नागरिकांसाठी विशेष आकर्षण ठरणार आहे.तीन दिवसीय चालणारे हे प्रदर्शन दररोज सकाळी १०:०० ते सायंकाळी ८:३० वाजेपर्यंत सुरू राहील, ज्यामुळे नोकरी करणारे आणि विद्यार्थी या दोघांनाही त्यांच्या सोयीनुसार प्रदर्शनाचा लाभ घेणे शक्य होईल. या प्रदर्शनाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये उपलब्ध असणाऱ्या पुस्तकांचा वैविध्यपूर्ण संग्रह.यामध्ये सर्व प्रकारची पुस्तके उपलब्ध असणार आहेत, जसे की कवितासंग्रह आणि कादंबरी यांसारख्या लोकप्रिय साहित्यासह विविध विषयांवरील पुस्तके एकाच छताखाली वाचकांसाठी उपलब्ध असतील. पिंपरी-चिंचवड शहराच्या सांस्कृतिक आणि साहित्यिक जडणघडणीसाठी हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा आहे.या पुस्तक प्रदर्शनामध्ये लाखो पुस्तके वाचकांसाठी उपलब्ध असून, आयोजकांनी शहरवासीय आणि वाचनप्रेमी नागरिकांना आवाहन केले आहे की या तीन दिवस चालणाऱ्या भव्य पुस्तक प्रदर्शनात जास्तीत जास्त संख्येने सहभागी होऊन शहराची वाचनसंस्कृती जपणारी आणि समृद्ध करणारी नवी ओळख निर्माण करावी.साहित्य आणि ज्ञानाच्या या उत्सवात सहभागी होऊन वाचनाचा आनंद अनुभवावा आणि या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे नम्र आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# शिरीष आप्पा साठे सोशल फाउंडेशन वतीने खेळ रंगला पैठणीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : शिरीष आप्पा साठे सोशल फाउंडेशन वतीने पिंपरी चिंचवड शहरातील प्रभाग क्रमांक 26 मधील सर्व महिला, भगिनींसाठी 'होम मिनिस्टर खेळ पैठणीचा' कार्यक्रम मोठ्या उत्साहात व दिमाखात संपन्न झाला.**




होम मिनिस्टर खेळ पैठणीचा हा कार्यक्रम प्रसिद्ध निवेदक ओम यादव यांच्या सादरीकरणात संपन्न झाला.या कार्यक्रमात असंख्य महिला, भगिनी यांनी सहभाग घेतला. या खेळ पैठणीचा कार्यक्रमात सहभागी झालेल्या सर्व महिला भगिनींना भेटवस्तू देण्यात आल्या. तसेच या कार्यक्रमात विजेत्या ठरलेल्या महिलांना विविध बक्षिसे देण्यात आली. या कार्यक्रमाचे निमित्ताने चिंचवड विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते तथा माजी विरोधी पक्ष नेते विठ्ठल उर्फ नाना काटे यांनी प्रमुख उपस्थिती दर्शविली. नाना काटे यांच्या हस्ते आगामी काळात प्रदर्शित होणाऱ्या रील स्टार या मराठी चित्रपटाचे पोस्टरचे अनावरण करण्यात आले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने माजी नगरसेवक चंद्रकांत तापकीर, युवा नेते रणजित कलाटे, संत तुकाराम महाराज यांचे वंशज प्रशांत महाराज मोरे, मीराताई कदम यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाला प्रभागातील असंख्य महिला, भगिनी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सर्व उपस्थितांचे शिरीष आप्पा साठे यांनी आभार व्यक्त केले.

# सचिन साठे सोशल फाउंडेशन आयोजित 'न्यू होम मिनिस्टर-खेळ पैठणीचा' कार्यक्रम उत्साहात

>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी : सचिन साठे सोशल फाउंडेशनच्या वतीने आयोजित “न्यू होम मिनिस्टर – खेळ पैठणीचा” हा भव्य कार्यक्रम उत्साहपूर्ण आणि आनंदमय वातावरणात यशस्वीपणे पार पडला.यावेळी मा. आमदार अश्विनी लक्ष्मण जगताप, मा. नगरसेविका मोनिका मुरलीधर मोहोळ आणि सामाजिक कार्यकर्त्या स्वप्ना शत्रुघ्न काटे यांच्या प्रमुख उपस्थितीत महिलांनी आपल्या कलागुणांचा आणि आत्मविश्वासाचा सुंदर आविष्कार सादर केला.स्पर्धेत प्रथम क्रमांक पुष्पा लोकरे, द्वितीय क्रमांक सुनीता सत्यनारायण क्षिरसागर आणि तृतीय क्रमांक निकिता ऋषिकेश राजे यांनी पटकावला. लकी ड्रॉ विजेत्यांमध्ये अमृता संदीप हळदणकर, गजगबाई मुरलीधर काटे, किरण अरुण पपिळ, सोनाली आशुतोष देसले आणि अमृता रामेश्वर दहे यांचा समावेश झाला.उपस्थित प्रत्येक महिला भगिनींना आकर्षक साडी भेट देण्यात आली आणि स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सुंदर सांगता झाली.महिलांच्या सशक्तीकरणाचा आणि आनंदाचा हा उत्सव यशस्वी करण्यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे सचिन साठे यांनी आभार व्यक्त केले.

# वृक्षारोपणाचे छायाचित्र समाजमाध्यमावर प्रसारित करण्याचे महापालिकेचे आवाहन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : पर्यावरण संवर्धन, हवामान बदल नियंत्रण आणि हरित जीवनशैलीचा प्रसार या उद्देशाने राज्य शासनाने सुरू केलेल्या 'माझी वसुंधरा' या उपक्रमात 'हरित प्रतिज्ञा' घेऊन सहभागी व्हावे, असे आवाहन पिंपरी-चिंचवड महापालिकेने केले आहे.**





यासाठी मोहिमेंतर्गत वृक्षारोपण करताना किंवा हरित उपक्रमात सहभागी होताना एक छायाचित्र काढावे, ते समाजमाध्यमावर प्रसारित करावे. तसेच, महापालिकेच्या अधिकृत समाजमाध्यमातील पेजला 'टॅग' करावे, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून नागरिकांमध्ये वसुंधरा संवर्धन, हरित सवयी आणि जबाबदार नागरी सहभाग वाढवण्यासाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. तसेच,'माझी वसुंधरा' मोहिमेमध्ये जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे, यासाठी विविध विभागांमध्ये समन्वय साधून विशेष कार्ययोजना आखण्यात आली आहे. शाळा, महाविद्यालये, उद्योगसंस्था, महिला बचत गट, रहिवासी संघटना आणि सामाजिक संस्था यांनाही या उपक्रमात सहभागी होण्यासाठी जनजागृतीच्या माध्यमातून प्रोत्साहित केले जात आहे.आता या मोहिमेचा भाग म्हणून शहरातील नागरिकांनी ऑनलाइन पद्धतीने 'हरित प्रतिज्ञा' घेऊन पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संकल्प करून आपल्या कृतीतून निसर्गसंवर्धनाची जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहन महापालिकेने केले आहे.सर्वप्रथम https://majhivasundhara.in या संकेतस्थळावर जाऊन मराठी, इंग्रजी यापैकी मराठी भाषा निवडावी. 'हरित शपथ' हा पर्याय क्लिक करावा लागेल, 'त्वरित तुमची ई-प्लेज घ्या' या पर्यायावर क्लिक केल्यानंतर 'पुढे जा' या पर्यायावर क्लिक करावे लागेल. 'वैयक्तिक, सामूहिक' यापैकी एक पर्याय निवडून 'सादर करा' या पर्यायावर क्लिक केल्यानंतर प्रतिज्ञा अर्ज भरून 'सादर करा' या पर्यायावर क्लिक करावे लागणार आहे.

# गणेश काळे खून प्रकरणातील आरोपींना अटक, पुणे पोलिसांना यश

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे शहरातील नाना पेठेतील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे माजी नगरसेवक वनराज आंदेकर याचा 1 सप्टेंबर 2024 मध्ये गणेश कोमकर याच्या टोळीतील गुंडांनी गोळ्या झाडून आणि कोयत्याने वार करून खून केला होता.**




या घटनेला वर्ष पूर्ण होताच,आरोपी गणेश कोमकर चा मुलगा आयुष कोमकर याचा गोळ्या झाडून आंदेकर टोळीतील दोघांनी खून केल्याची घटना घडली होती.

त्या घटनेनंतर दोन्ही टोळ्यातील अनेक आरोपींना पुणे पोलिसांनी अटक केली.हे टोळी युद्ध थांबत नाही तोवर आता पुन्हा एकदा आंदेकर आणि कोमकर टोळी युद्ध पाहण्यास मिळाले आहे.वनराज आंदेकरच्या खुनात वापरलेली पिस्तुले समीर काळे याने मध्यप्रदेशातून आणली होती.तर समीर काळे हा सध्या कारागृहात असून त्याचा भाऊ गणेश काळे हा आज दुपारच्या सुमारास कोंढवा भागातील खडी मशीन चौकातील पेट्रोल पंपापासून रिक्षा घेऊन जात होता.त्यावेळी दोन दुचाकीवरून आलेल्या चौघांनी गणेश काळे वर गोळ्या झाडून आणि कोयत्याने वार करून खून केल्याची घटना घडली.

त्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाले. तर या खुनाच्या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली असून ही सर्व घटना सीसीटीव्ही कॅमेरामध्ये कैद झाली आहे.गणेश काळे खून प्रकरणातील आरोपींचा शोध घेण्यासाठी पुणे पोलिसांची पथके विविध भागात रवाना करण्यात आली होती.

तर खून झालेल्या घटना स्थळ परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरा च्या माध्यमांतून देखील आरोपींचा शोध घेतला जात असताना,सातार्‍याच्या दिशेने पळून जाणाऱ्या चार आरोपींना खेड शिवापूर येथून अमन शेख,अरबाज पटेल यांच्यासह दोन अल्पवयीन अशी एकूण चार जणांना अटक करण्यात पुणे पोलिसांना यश आले असून अधिक तपास करण्यात येत असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# चार दिवसांत अनेक घडामोडी;, पण प्रभाग 15 ने दाखवले 'जहां भरोसा होता है, वहां मौजूदगी की जरूरत नहीं होती!

## उपस्थिती नव्हे, विश्वासच ठरला ताकदीचा पुरावा; अनुप मोरे यांचे नेतृत्व पुन्हा अधोरेखित.. कार्यकर्ता मेळाव्यात विश्वास, निष्ठा आणि एकतेचा अनोखा संगम...

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**निगडी प्राधिकरणातील भाजप कार्यकर्ता मेळाव्यात मुख्य संयोजक भाजयुमो प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे यांची अनुपस्थिती विशेष चर्चेचा विषय ठरली. मेळाव्याच्या आमंत्रणपत्रिका आणि बॅनरवर त्यांचे नाव प्रमुख आयोजक आणि मार्गदर्शक म्हणून झळकत असल्याने कार्यकर्त्यांमध्ये त्यांच्या उपस्थितीची अपेक्षा होती**



मात्र, कार्यक्रमादरम्यान आयोजकांनी जाहीर केले की अपरिहार्य व तांत्रिक कारणास्तव अनुप मोरे उपस्थित राहू शकले नाहीत. मेळाव्याला अनुप मोरे काही तांत्रिक कारणास्तव उपस्थित नसतानाही त्यांच्या कार्यकर्त्यांमध्ये तेवढाच उत्साह आणि जल्लोष पाहायला मिळाला. कार्यकर्त्यांच्या घोषणांमधून "अनुप मोरे" यांच्यावरील निष्ठा आणि प्रेम स्पष्टपणे जाणवले. फक्त राजकारणी नव्हे, तर एक तळागाळातील समाजसेवक कसा असावा, याचे मूर्तिमंत उदाहरण अनुप मोरे यांच्या कार्यातून दिसून येते. सर्व विरोधक, माध्यम प्रतिनिधी आणि पिंपरी-चिंचवडमधील विविध राजकीय पक्षांचे लक्ष या मेळाव्याकडे होते. चार दिवसांत अनेक घडामोडी घडूनही प्रभाग क्रमांक १५ मधील मतदार आणि कार्यकर्त्यांनी "जहां भरोसा होता है, वहां मौजूदगी की जरूरत नहीं होती," हे दाखवून दिले. विशेष म्हणजे, प्रभागातील सर्व इच्छुक उमेदवारांना एकाच व्यासपीठावर आणून हा मेळावा पिंपरी-चिंचवडच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रातील पहिलाच असा अनोखा प्रयोग ठरला. अनुपस्थित असूनही कार्यकर्त्यांनी त्यांच्या नेतृत्वावर ठाम विश्वास व्यक्त केला. "अनुप मोरे देतील ते उमेदवार आम्हाला मान्य राहतील," अशी भूमिका इच्छुक उमेदवारांनी स्पष्टपणे मांडली. पक्षाच्या नेत्यांनीही "अनुप मोरे यांनी काळजी करू नये, आम्ही सर्वजण त्यांच्या सोबत आहोत," असे सांगून त्यांना ठाम पाठिंबा दिला. या प्रसंगातून अनुप मोरे यांचे प्राधिकरणातील नेतृत्व, लोकप्रियता आणि तळागाळातील पकड पुन्हा अधोरेखित झाली.दरम्यान भर पावसात उसळलेल्या गर्दीत प्रभाग क्र. १५ (आकुर्डी, निगडी, प्राधिकरण) येथील भाजप कार्यकर्ता मेळाव्यातून पक्षाने निवडणुकीचे रणशिंग फुंकले. बुथप्रमुख, शक्तीप्रमुख, महिला, युवा आणि जेष्ठ कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली.यावेळी आमदार उमाताई खापरे, आमदार अमित गोरखे, शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, प्रदेश कार्यकारिणी सदस्य सदाशिव खाडे, माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके, माजी उपमहापौर शैलजाताई मोरे, माजी नगरसेविका शर्मिला बाबर, महामंत्री मधुकर बच्चे, मंडल अध्यक्ष, प्राधिकरण चिंचवड जयदीप खापरे, भाजपा सचिव राजेंद्र बाबर, माजी महापौर आर.एस. कुमार, विजय शिनकर, सलिम शिकलगार, अरुण थोरात, अतुल इनामदार, समिर जावळकर, उद्योजक संदीप काटे आदी उपस्थित होते. आमदार उमा खापरे म्हणाल्या, "विरोधकांनी भाजपला लेचेपेचे समजू नये. भाजप हा एकसंघ पक्ष आहे. 'सबका साथ, सबका विकास' हेच आमचे ब्रीद असून, प्रभाग १५ मधील सर्व चारही जागा आम्ही जिंकू."शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे म्हणाले, "हा फक्त प्रभागाचा नव्हे तर शहराचा मेळावा ठरला आहे. अनुप मोरे यांनी पक्षाची प्रतिमा जपली; त्यांच्या पाठीशी ठाम उभे राहा."

आमदार अमित गोरखे यांनी सांगितले की, "पावसातही कार्यकर्त्यांची उपस्थिती हीच भाजपची खरी ताकद आहे."माजी उपमहापौर शैलजाताई मोरे यांनी प्रभागातील विकासकामांचा उल्लेख करत सांगितले की, "२४x७ पाणी योजना, सांडपाणी प्रकल्प, मेट्रो कामे आणि उद्यान उभारणी भाजपच्या पुढाकाराने साकारली आहेत."

# उद्योग मदत कक्ष ठप्प - उद्योजकांमध्ये तीव्र नाराजी!

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**भोसरी : एमआयडीसी परिसरातील उद्योजकांचे प्रश्न सोडविण्यासाठी महानगरपालिकेने स्थापन केलेल्या उद्योग मदत कक्ष या महत्त्वाच्या यंत्रणेला गेल्या कित्येक महिन्यांपासून पूर्णतः ठप्प केल्याने उद्योजकांमध्ये तीव्र संताप निर्माण झाला आहे.**



फोरम ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष अभय सोपानराव भोर यांनी महानगरपालिकेस खडे बोल सुनावत स्पष्ट सवाल केला आहे की, उद्योग मदत कक्ष हे फक्त देखावा करण्यासाठी होते का?उद्योजकांना न्याय कधी मिळणार?"

**उद्योग कक्षाचा मागणीनुसार प्रारंभ झाला आणि फक्त दोन बैठकांवरच त्याचा प्रवास थांबला! त्या बैठकीत उद्योजकांनी त्यांच्या अडचणी स्पष्टपणे मांडल्या —**

१.पायाभूत सुविधांची कमतरता

२. रोज उद्भवणाऱ्या स्थानिक समस्या परिसरातील रोड लाईट वाहतुकीच्या समस्या स्पीड ब्रेकर महिला कामगारांना बस सेवा सुविधा उद्यान फूटपाथ गटारे ड्रेनेज लाईन स्वच्छतागृह असे एक ना अनेक समस्यांनी वेढलेली एमआयडीसी आहे.

३. शासकीय यंत्रणांकडून वेळेवर प्रतिसाद नसणे

४. परंतु त्यानंतर एकही आढावा बैठक न घेता त्या सर्व समस्या धुळ खात पडल्या आहेत.उद्योगाकडे पूर्ण दुर्लक्ष!

एमआयडीसी परिसरातील उद्योजकांना रोज नवनव्या आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. अनेक दिवसांपासून उद्योगांसाठी स्वतंत्र अधिकारी नियुक्त करण्याची मागणी असतानाही महानगरपालिका पूर्णतः ढिम्म! आता संयम सुटतोय — आंदोलनाचा इशारा!

अभय भोर यांनी चेतावणी देत म्हटले , उद्योजक म्हणजे शहराच्या अर्थव्यवस्थेची कणा, उद्योगांची कणा मोडण्याचा डाव बंद करा. एमआयडीसी परिसरातील उद्योजकांकडून महानगरपालिकेला दरवर्षी कोट्यवधी रुपयांचा कर जमा होतो! तरीही पायाभूत सुविधा नाही, प्रशासनाचा प्रतिसाद नाही, उद्योगांचे पैसे कुठे जातात? असा सवाल फोरम ऑफ स्मॉल स्केल इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष अभय सोपानराव भोर यांनी संताप व्यक्त केला.

आम्हाला कराच्या पावत्या देतात, पण सुविधांसाठी झुलवत ठेवतात! हा उद्योगांचा अपमान आहे — आर्थिक शोषण आहे!" त्यांचे प्रश्न धाब्यावर बसवणे आम्ही अजिबात सहन करणार नाही! महापालिकेने तातडीने बैठक बोलवावी, अन्यथा आंदोलनाचा इशारा प्रसिद्धीपत्राद्वारे देण्यात आला.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 89999 48968

# लवकरच ...!


मेट्रो सिटी
आयकॉन अवॉर्ड २०२५
METRO CITY ICON
AWARD 2025
दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत वर्धापन दिन निमित्त
पुरस्कार सोहळा २०२५
वर्ष तिसरे मे
सामाजिक,शैक्षणिक,राजकीय,वैद्यकीय, व्यावसायिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना मेट्रोसिटी आयकॉन अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात येत आहे.
– आयोजक –
शबनम न्यूज मिडिया ग्रुप
शबनम न्यूज | दैनिक मेट्रोसिटी वृत्तांत | सिटीझन मीडिया | सनशाईन ग्राफिक्स
अधिक माहिती साठी संपर्क : 7218327321 / 7620889734